Exh. 1

# को.वि. दिवाणी न्यायधिश, कनिष्ठ स्तर, कळमेश्वर

एम.जे.सी. नं. /२०२६ दाखल ता. १७/०१/२०२६

अर्जदार :— श्री. जयसिंग रामाजी धोटे
वय ७३ वर्ष, धंदा— शेती
रा.पो. वार्ड नं. ८ नाईक लेआऊट, पांढुर्णा रोड, सावनेर
ता. सावनेर जि. नागपूर

— विरूध्द —

गैरअर्जदार :— निरंक

NOTARY LANKESH A. GAJBHIYE DIST NAGPUR (M.S.) INDIA Regd. No. 5626 My Term Expires on 25/11/2029 GOVT. OF INDIA

**बॉम्बे रेग्युलेशन VIII of 1827 अंतर्गत कायदेशिर वारसांन प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्ज**

**अर्जदाराचा अर्ज येणेप्रमाणे :—**

१) असे की, अर्जदार हा मुळचा सावनेर येथील राहणारा असून वरील पत्यावर राहत आहे. असे की अर्जदार यांची सख्खी बहीण श्रीमती नानुबाई रामाजी धोटे उर्फ नानुबाई संतोषराव कडू ही दिनांक १३/०६/२०१९ रोजी काटोल येथे मरण पावली. तिचे पती नामे संतोष विठोबाजी कडू हे दिनांक २०/१/२०१७ रोजी काटोल येथे मरण पावले तर त्यांचा मुलगा नामे हेमराज संतोषराव कडू हा दि. ११/१०/२०१२ रोजी पंचवटी काटोल येथे अविवाहीत मरण पावला. असे की, त्यांना अपत्य नव्हते, त्यांची देखभाल व सांभाळ अर्जदार हेच करीत होते.

Order
Issue paper publication and citation

२) असे की, अर्जदार व मृतक बहीण नानुबाई उर्फ नानी यांच्या संयुक्त नावाने मौजा— निळगांव प.ह.नं. येथे सर्व्हे न. २३२ आराजी १.४३ हे.आर., जमा रूपये ११.६५, भो.व. १ शेतजमीन आहे. असे की, मृतक नानुबाई यांना तिच्या सासरचे कोणतेही वारसांन नसल्याने त्यांचे एकमेव वारस अर्जदार हेच आहेत. सदर मालमत्ता ही महसुल विभाग तहसिल कार्यालय कळमेश्वर अंतर्गत येत असल्याने त्या मालमत्तेच्या फेरफार संदर्भात वारसांन प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदर प्रकरण दाखल करण्यात येत आहे.

RAVINDRA RATHOD
Digitally signed by RAVINDRA RATHOD
Date: 2026.02.05 18:14:34 +0530